## अर्ज निशाणी १३२ खालील आदेश

## (CNR MHSI080002942015)

०१. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०३ भास्कर जिवबा जाधव व ११ सुरेखा सुर्यकांत फोंडेकर यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.०३ हे दि.२५/१०/२०२० रोजी व ११ हे दि.१८/११/२०२० रोजी मयत झाले आहेत. सबब, प्रस्तूत वादी यांनी प्रतिवादी क्र.०३ व ११ चे वारस अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.४ व ०६ ते १० यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१२ यांनी नि.क्र.१३७ वर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादीने मयत प्रतिवादींचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत नमुद कारणे खोटी व चुकीची बेकायदेशीर दिलेली आहेत. वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब हा सुमारे २ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा आहे. त्यामुळे तो कायद्याने माफ करता येणार नाही. प्रतिवादी मयत असतेवेळीसुध्दा वादींनी दाव्याचे कामकाज जाणीवपूर्वक चालू ठेवून पुरावा दिला. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा. अर्ज मंजूर करणेचा झाल्यास झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादीला वादीकडून रक्कम रु.५,०००/- ची कॉस्ट मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. प्रस्तूत दावा वादीने दावा मिळकतीचे वाटप व पृथ्थक कब्जा मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र.०३ व ११ चे वारस हे प्रस्तूत दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. अर्जात नमूद कारण योग्य वाटते. सबब, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– आदेश –**

०१. निशाणी क्र.१३२ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०३ व ११ यांच्या वारसांना प्रतिवादी क्र.०३ व ११ चे वारस म्हणून अभिलेखावर समाविष्ट करुन घ्यावे.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2025.07.18 17:34:22 +0530

स्थळ : कणकवली (शुभम जी. लट्टुरिया)
दिनांक : १८/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कणकवली.